नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४५ Issue - 45 | वार - गुरुवार दि. ९ जुलै २०२६ Blow- Thursday Date 9 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# देशात पावसाची एकूण तूट २४ टक्क्यांवर

## आतापर्यंत ३५० लाख हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण; कमी कालावधी व कमी पाणी लागणारी पिके घेण्याचा सल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे नैऋत्य मोसमी पावसाच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार सर्वसमावेशक तयारी, स्पष्ट धोरण आणि तळागाळापर्यंतच्या ठोस कृतीसह परिस्थिती हाताळत आहे. आव्हाने असली तरी, त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा यापूर्वीच सक्रिय करण्यात आली आहे, आणि ती पूर्ण क्षमतेने काम करत आहे. केंद्रीय कृषी, कृषक कल्याण आणि ग्राम विकास मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, जूनमध्ये ३३% पावसाची तूट नोंदवली गेली, त्यानंतर जुलैमध्ये मान्सूनच्या परिस्थितीत सुधारणा दिसून आली, आणि पावसाची एकूण तूट कमी होऊन २४ टक्क्यांवर आली. त्यांनी पुढे सांगितले की, गेल्या काही दिवसांत देशाच्या अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाल्यामुळे पर्जन्यमानाची कमतरता असलेल्या जिल्ह्यांची संख्या २६२ वरून १७८ वर आली.

नवी दिल्लीत उच्च स्तरीय आढावा बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना चौहान म्हणाले की, केंद्र सरकार महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, बिहार, झारखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, पंजाब, पश्चिम बंगाल आणि ओदिशा येथील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहे. जुलै महिन्यात पावसाचा जोर आणखी वाढेल, आणि त्यामुळे खरीपातील पेरणीला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आतापर्यंत ३५०.८५ लाख हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण झाली असून गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ती अंदाजे ९१.९५ लाख हेक्टरने कमी आहे अशी माहिती केंद्रीय मंत्र्यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मान्सूनच्या उशिरा आगमनाचा विशेषतः सोयाबीन आणि कापसाच्या पेरणीवर परिणाम झाला आहे. तथापि, पावसाला झालेल्या विलंबाचा परिणाम कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना मका, बाजरी आणि मूग यासारखी कमी



कालावधीत तयार होणारी आणि कमी पाणी लागणारी पिके घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

चौहान म्हणाले की, सरकारने एप्रिलपासूनच या आव्हानाचा सामना करण्याची तयारी सुरू केली होती. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या सहकार्याने, प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या जिल्ह्यांसाठी आपत्कालीन योजना तयार करण्यात आल्या आणि राज्य सरकारांना त्या खूप आधीच कळवण्यात आल्या. जून(गींपश) महिन्यात राबवण्यात आलेल्या 'खेत बचाओ अभियाना'चा एक भाग म्हणून, देशभरात १.२४ लाखांहून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आणि या माध्यमातून ८० लाखांहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहोचता आले. केंद्रीय मंत्री म्हणाले की, पेरणीची कामे अखंडितपणे सुरू राहावीत यासाठी सरकारने सुमारे १.७५ लाख क्विंटल राष्ट्रीय बियाणे साठा राखला आहे, जेणेकरून सर्व परिस्थितीत बियाण्यांची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित होईल. त्यांनी पुढे सांगितले की, किसान क्रेडिट कार्ड मोहीम तीव्र करण्यात आली असून, ३० जूनपर्यंत प्राप्त झालेल्या १.१४ लाख अर्जांपैकी ९४,००० हून अधिक अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

चौहान यांनी सांगितले की, प्रतिकूल हवामानामुळे पिकांचे नुकसान झाले, तर शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे यासाठी, प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठीचे प्रयत्न अधिक तीव्र करण्यात येत आहेत. सरकारची सज्जता अधोरेखित करताना चौहान म्हणाले की, एल निनोची शक्यता लक्षात घेऊन व्यापक देखरेख यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. एल निनो निरीक्षण कक्ष, पीक हवामान निरीक्षण गट, राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष आणि नियुक्त अधिकारी मान्सूनची प्रगती, पीक पेरणी, पिकांची स्थिती आणि बाजारातील कल यावर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. केंद्र सरकार केवळ बदलत्या परिस्थितीवर लक्ष ठेवत नसून, खरीप हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक ते सर्व सहाय्य मिळावे, यासाठी सुस्पष्ट प्रक्रिया, पुरेशी संसाधने आणि वेळेवर हस्तक्षेप, याद्वारे प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे, असे केंद्रीय मंत्री म्हणाले.

# गुजरातच्या सुरतमध्ये ३६ तासांत १८ इंच पावसाची नोंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सूरत : गुजरातच्या सुरतमध्ये ३६ तासांत १८ इंच पावसाची नोंद झाली. यामुळे जुलै १९४१ मध्ये नोंदवलेला १८ इंच पावसाचा ८५ वर्षे जुना विक्रम मोडला गेला. शहरात सर्वत्र पाणी तुंबलं असून फ्लाय ओव्हरमध्येही पाणी भरलं आहे. एका शॉपिंग मॉलचा एक मजला पाण्याखाली गेला आहे आणि रस्त्यांवर गाड्या तरंगत आहेत. शहराचा कोणताही भाग निर्जन राहिला नाही. सुरतमध्ये विजेचा धक्का, झाडे कोसळल्याने आणि वीज पडून नऊ जणांचा मृत्यू झाला. पुराच्या पाण्यात अडकलेल्या ३,४०० लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. सुरत आणि जवळच्या नवसारी परिसरातील शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्या बंद आहेत. लोकांना केवळ अत्यावश्यक कामासाठीच घराबाहेर पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये मंगळवारी संध्याकाळी एक पाच मजली इमारत कोसळली. दरम्यान, राजस्थानमधील जालोरमध्ये नदीत एक जीप उलटली. चित्तोरगडमध्ये वीज पडून एकाच कुटुंबातील तीन सदस्यांचा मृत्यू झाला.




दिल्ली-जयपूर महामार्ग खचला

मुसळधार पावसामुळे दिल्ली-जयपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ खचला असून, त्यामुळे १० किमी लांब वाहतूक कोंडी झाली आहे. एक शालेय बस नाल्यात अडकली. दरम्यान, गुरुग्रामच्या अनेक भागांमध्ये दोन फुटांपर्यंत पाणी साचले आहे. पोलिसांनी कंपन्यांना पुढील काही दिवस कर्मचाऱ्यांना घरून काम (थत्रक्ष) करण्याची परवानगी देण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, अरुणाचल प्रदेशातील २६ जिल्ह्यांमध्ये पूर आणि भूस्खलनामुळे ९४,००० हून अधिक लोकांना फटका बसला आहे. चार जणांचा मृत्यू झाला असून, २१ जण जखमी झाले आहेत आणि दोन महिला बेपत्ता आहेत.

दुसरीकडे, १ जुलैपासून महाराष्ट्रातील पालघरमध्ये पावसामुळे १० जणांचा बळी गेला आहे. गेल्या २४ तासांत तीन जणांचा मृत्यू झाला आहे. प्रशासनाने ३८९ कुटुंबांतील १,२६१ लोकांना सुरक्षित स्थळी हलवून मदत शिबिरांमध्ये दाखल केले आहे. पावसामुळे दोन सिमेंटची आणि चार कच्ची घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली, तर ७३ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे.

मुंबईत पावसामुळे लोकल ट्रेन २५-३० मिनिटे उशिरा धावत आहेत. वसई-विरार आणि दक्षिण गुजरातमध्ये पाणी साचल्यामुळे ३९ गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. २१ गाड्या मध्येच थांबवण्यात आल्या आणि ४६ गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात आले.

केरळमधील वायनाड जिल्ह्यातील बोगद्याच्या रस्त्याच्या बांधकाम स्थळी झालेल्या भूस्खलनानंतर एक दिवसानेही बचावकार्य सुरू आहे. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला असून, पाच जण अद्याप बेपत्ता आहेत. बचाव पथके ढिगाऱ्याखाली बेपत्ता झालेल्यांचा शोध घेत आहेत.

## युद्धविराम संपुष्टात, इराणवर पुन्हा जोरदार हल्ला करू : डोनाल्ड ट्रम्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अंकारा : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी सांगितले की, अमेरिका इराणवर आणखी एका रात्री हल्ला करण्याची तयारी करत आहे. याआधी काही तासांपूर्वीच त्यांनी युद्धविराम संपुष्टात आल्याचे विधान केले होते. संघर्ष पुन्हा सुरू होण्याच्या शक्यतेबाबत विचारलेल्या प्रश्नावर ट्रम्प म्हणाले, आम्ही काल रात्री त्यांच्यावर अतिशय जोरदार हल्ला केला होता. कदाचित आज रात्रीही आम्ही त्यांच्यावर तितक्याच तीव्रतेने हल्ला करू. ट्रम्प यांनी हे वक्तव्य तुर्कियेची राजधानी अंकारा येथे आयोजित नाटो शिखर परिषदेदरम्यान केले. त्यांनी सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई सुरू आहे.इराणबाबत बोलताना ट्रम्प म्हणाले, ते अत्यंत चुकीचे वर्तन करत आहेत.




विभागीय आयुक्त विजया लक्ष्मी बिदरी यांची माहिती

# नैसर्गिक आपत्तीग्रस्त सुमारे ८.८४ लाख शेतकऱ्यांना ₹७१३.९६ कोटींची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : नैसर्गिक आपत्तींमुळे अतिवृष्टी, पूरपरिस्थिती तसेच अवकाळी पावसामुळे शेतपीक व शेतजमिनीचे नुकसान झालेल्या नागपूर विभागातील ८ लाख ८३ हजार ९६५ शेतकरी खातेदारांच्या बँक खात्यात एकूण ७१३ कोटी ९५ लाख ७२ हजार रुपयांची मदत जमा करण्यात आली आहे,

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार सन २०२५-२६ मध्ये नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हानिहाय निधीचे वाटप करण्यात आले असून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट निधी जमा करण्यात आली असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजया लक्ष्मी बिदरी यांनी दिली. नैसर्गिक आपत्तींमुळे अतिवृष्टी, पूर, अवकाळी पाऊस, दुष्काळ आदी कारणांमुळे नुकसान झालेल्या नागरिकांना शासनामार्फत मदत देण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे. या अंतर्गत शेतपिकांचे नुकसान, शेतजमिनीचे नुकसान, घरांची पडझड, जनावरांचा मृत्यू तसेच जीवितहानीबाबत मदत व सहानुग्रह अनुदान राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागामार्फत वितरित करण्यात येते.

नागपूर विभागात २०२५- २०२६ या वर्षात अतिवृष्टी, पूरपरिस्थिती तसेच अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भातील ९ लाख ९५ हजार ५२३ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी एकूण ७९६ कोटी ७१ लाख ५ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ८ लाख ८३ हजार ९६५ प्रकरणांमध्ये ७१३ कोटी ९५ लाख ७२ हजार रुपयांचे वितरण पूर्ण झाले आहे.

जिल्हानिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे

नागपूर जिल्ह्यात १ लाख ३१ हजार २६७ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १ लाख १५ हजार २८७ प्रकरणांमध्ये १२४ कोटी ५८ लाख ५६ हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत.

वर्धा जिल्ह्यात २ लाख ५४ हजार ५०० प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी २ लाख ३५ हजार ४२७ प्रकरणांमध्ये २२४ कोटी ८३ लाख १४ हजार रुपये अदा करण्यात आले आहेत.भंडारा जिल्ह्यात १ लाख ४१ हजार ५७१ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १ लाख २६ हजार ९१० प्रकरणांमध्ये ८४ कोटी १२ लाख २४ हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत.

गोंदिया जिल्ह्यात १ लाख ४८ हजार ८८२ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १ लाख ३७ हजार १८७ प्रकरणांमध्ये ८८ कोटी ५२ लाख ११ हजार रुपये अदा करण्यात आले आहेत.चंद्रपूर जिल्ह्यात २ लाख २० हजार ६६८ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १ लाख ९० हजार ७५० प्रकरणांमध्ये १३३ कोटी ७४ लाख ९ हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत.गडचिरोली जिल्ह्यात ९८ हजार ६१५ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ७८ हजार ४०४ प्रकरणांमध्ये ५८ कोटी १५ लाख ५४ हजार रुपये अदा करण्यात आले आहेत.

निधी वितरणाची प्रक्रिया संबंधित जिल्हा प्रशासनामार्फत प्राधान्याने सुरू असून पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात लवकरच मदत जमा करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त श्रीमती विजया लक्ष्मीबिदरी यांनी दिले.

# संपादकीय....

## कही खुशी कही गम

देशातील बहुतांश राज्यांमध्ये मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली असून, गेल्या २४ तासांत देशातील निम्म्याहून अधिक भागात जोरदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला असला, तरी अनेक ठिकाणी पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर अद्याप देशभरातील अनेक राज्ये व जिल्हे पावसाअभावी कोरडी ठाक आहेत. गुजरातमधील सूरज, अहमदाबाद तर महाराष्ट्रातील मुंबई, पुणे व इतर जिल्ह्यात दमदार पावसाने हजेरी लावली आहे. खरीपाची पेरणीसाठी आसुसलेला शेतकरी पाऊस येण्याची वाट पाहतोय. तसेच नुकतेच भारतीय हवामान विभागाने अनेक राज्यांसाठी मुसळधार पावसाचा रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. विभागाच्या अंदाजानुसार, पुढील २४ तासांत उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, सिक्कीम, कर्नाटक, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये अतिवृष्टीची शक्यता आहे. मध्य भारतात ९ जुलै रोजी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, पश्चिम उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार आणि हिमाचल प्रदेशमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. याशिवाय उप-हिमालयीन पश्चिम बंगाल, सिक्कीम, आसाम, मेघालय, मध्य महाराष्ट्र, पश्चिम मध्य प्रदेश, कोकण आणि गोवा येथे मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, या भागांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, गुजरात, पूर्व राजस्थान, पूर्व मध्य प्रदेश, पश्चिम उत्तर प्रदेश, बिहार, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा आणि किनारपट्टीवरील कर्नाटक या भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, येथेही जोरदार पावसाची शक्यता आहे. दिल्लीसह पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानच्या काही भागांतही पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, ९ जुलैनंतर मध्य भारतातील पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता असून, गुरुवारपासून पावसाचे प्रमाण घटण्याचा अंदाज आहे. गेल्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण कर्नाटकमध्ये अत्यंत मुसळधार पाऊस झाला.

# देशभर अभाविपच्या शाखा व संपर्क केंद्र

## ९-१५ जुलै:अखिल भारतीय विद्यार्थी परिषद- एबीव्हीपी स्थापना व राष्ट्रीय विद्यार्थी दिन विशेष.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद- एबीव्हीपी ही एक राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना आहे, ही संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांशी साम्य असलेली संघटना आहे. तीस लाख वीस हजाराहून जास्त सदस्य असलेली ही जगातील मोठी विद्यार्थी संघटना आहे. अ.भा.वि.प. ही उजव्या विचारश्रेणीची भारतीय विद्यार्थी संघटना असून ती रा.स्वं.संघाशी जोडलेली आहे. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विद्यार्थी हितासाठी काम करणारी संघटना आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींची ही सुंदर रोचक संकलित माहिती सदर लेखातून वाचकसेवेत समर्पित... संपादक.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय पुनर्निर्माण, सक्षम आणि सशक्त तरुण पिढी घडवण्याच्या उदात्त ध्येयाने दि.९ जुलै १९४९ रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास सुरू झाला. कोणत्याही संघटनेसाठी ७५व्या वर्षापर्यंत पोहोचणे ही एक अभिमानास्पद, महत्त्वाची आणि उत्सवाची घटना होय. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संघटनात्मक प्रवासात ही घटना अशा वेळी आली आहे, जेव्हा देशाच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी पर्व सुरू आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा हा प्रवास देशाच्या विकासासोबतच देशासाठी समर्पित सक्षम तरुण पिढी घडवण्याचा आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे स्वरूप ७५व्या वर्षात व्यापक आणि बहुआयामी झाले. मागील वर्षी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची एकूण सदस्यता ४५ लाखांहून अधिक झाली असून, देशभरात २१ हजारांहून अधिक ठिकाणी अभाविपच्या शाखा व संपर्क केंद्र आहेत. हा केवळ आकडा नसून, विद्यार्थी परिषदेचे अखिल भारतीय चारित्र्य स्पष्टपणे समोर आणून ती जागतिक स्तरावरील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना असल्याचे सिद्ध करते. गेली ७४ वर्षे शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर कार्यरत असलेल्या अभाविपच्या सकारात्मक शक्तीने भारतीय शैक्षणिक परिसरांमधून राजकारण, चित्रपट, मीडिया, व्यवसाय, शिक्षण, प्रशासन आदी क्षेत्रांना प्रभावी युवा नेतृत्व दिले आहे. आज या वैविध्यपूर्ण क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्ती आहेत, जे विद्यार्थी जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी सक्रियपणे जोडलेले आहेत.

देशातील आणीबाणीसारख्या मोठ्या संकटाविरुद्ध अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची महत्त्वाची भूमिका आणि योगदानासोबतच लहान-मोठ्या प्रमाणात अशी अनेक उदाहरणे आहेत, जेव्हा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली देशातील तरुणांनी सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अभाविपचे राष्ट्रीय संघटनमंत्री राहिलेले आणि सध्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख असलेले सुनील आंबेकर अभाविपच्या संकल्पानिमित्त लिहितात की, भारत ही आमची माता आहे, आम्ही पुत्राप्रमाणे देशवासीयांची सेवा करू, या संकल्पासोबत विद्यार्थी परिषदेची स्थापना झाली होती. विद्यार्थी परिषदेचे कार्यक्षेत्र जरी शैक्षणिक परिसर म्हणजेच कॅम्पस असले, तरी वैचारिक क्षेत्र हे शिक्षणाच्या पलीकडे जाऊन देशहिताच्या प्रत्येक मुद्द्याशी निगडित आहे.

अगदी सन १९६१ सालपासून हजारो शिक्षण संस्थेमध्ये अभाविपच्या अनेक शाखांचा सक्रिय सहभाग असल्याचे दिसते. सन १९७०नंतर अभाविपने मोठ्याप्रमाणावर मध्यम वर्गाचे प्रश्न हाताळायला सुरुवात केली, जे इतर डाव्या पक्षांकडुन हाताळले जात होते आणि त्यामध्ये तत्कालिन सरकारची भ्रष्टाचाराबाबतची अनास्था आणि इतर मुद्यांचा सहभाग होता. जेपी. चळवळीमध्ये आणि त्याभोवतालच्या अनेक निदर्शनांमध्ये अभाविपचा सक्रिय सहभाग होता, त्यांनी त्यासाठी गुजराथ आणि बिहारमधील विद्यार्थी संघटनांबरोबर हातमिळवणी केली होती, आणिबाणीनंतर याच सगळ्या कामांमुळे अभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. सन १९७४नंतर अभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठ्याप्रमाणात वाढ झाली आणि ती १६०,०००च्या वर पोहोचली शिवाय त्यांनी ७९० ठिकाणी आपल्या शाखासुद्धा सुरू केल्या, भारतभरातील अनेक विद्यापिठांमध्ये प्रभावी अस्तित्व निर्माण केले. हीच संख्या १९८३ दरम्यान २५०,०००च्या वर गेली आणि ११००च्यावर शाखा भारतभर उघडल्या गेल्या. सन १९९०च्या बाबरी मशिदीच्या घटनेमुळे आणि नरसिंहराव सरकारने मुक्त बाजाराचे धोरण स्वीकारल्यामुळे मोठ्याप्रमाणावर अभाविप वाढली आणि आता सन २०१६ला त्यांची सदस्य संख्या ३.१७८ लाखाच्या वर पोहोचलेली आहे. त्यामुळे ही संघटना भारतातील सगळ्यात मोठी विद्यार्थी संघटना आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास हा भारतीय मूल्यांनी प्रेरित देशभक्त तरुणांची सक्षम पिढी घडवण्याचा प्रवास राहिला आहे. कोरोना महामारीच्या काळात, देशावर संकट आले असताना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली अनेक तरुणांनी लोकांचे दुःख कमी करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. हे ताजे उदाहरण आहे, असे अनेक प्रसंग आले आहेत, जेव्हा अभाविपच्या नेतृत्वाखाली तरुणांनी एकत्र येऊन देशातील विविध समस्या सोडवण्यासाठी सर्वप्रथम पुढे आला. देशातील शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सध्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची हितचिंतक म्हणून आपली भूमिका बजावत आहे. आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विविध शाखा पर्यावरण, सेवा, क्रीडा इत्यादी क्षेत्रातही कार्यरतअभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठी वाढ आहेत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आपला प्रवास सतत नवनवीन विषय आणि क्षेत्रांशी जोडून ठेवला आहे, त्यामुळेच ७५व्या वर्षात पोहोचलेला हा प्रवास कुठेही खडतर किंवा स्तब्ध न राहता सतत गतिमान आणि नव्या क्षेत्रांमध्ये गुंतलेला दिसतो. एकीकडे उर्वरित विद्यार्थी संघटना मर्यादित क्षेत्रात एकाकी आंदोलनापुरत्या मर्यादित असताना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास केवळ आंदोलनांपुरता मर्यादित न राहता, शिस्तबद्ध सर्जनशीलतेच्या माध्यमातून तरुणांना जगाशी संबंधित विविध विषयांशी जोडणारा आणि भारतीय मूल्यांशी जोडून सतत गतिमान राहणे व अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणादायी आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा शिस्तबद्ध, भारतीय-केंद्रित विचार मार्गावर गतिमानतेचा प्रवास असाच प्रवाहित राहील, जेणेकरून येणार्या पिढ्यांना नवीन आव्हानांना तोंड देता येईल आणि राष्ट्र पुनर्निर्माणाचे स्वप्न पूर्ण करता येईल व सक्षम नागरिक म्हणून भारतीय तरुण प्रत्येक क्षेत्रात जागतिक नेतृत्वाची भूमिका बजावू शकतील.

!! सर्व देशवासीयांना अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्थापना व राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर, गडचिरोली;**
**जि.गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप-**
**९४२३७१४८८३.**

# रमाई आवास योजनेत मोठा भ्रष्टाचार; भाजप नगरसेविकेचा मुलगा लाभार्थी, देवेंद्र फडणवीस-एकनाथ शिंदेंच्या नावे टॅक्स पावती; अंबादास दानवेंचा गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेत रमाई आवास योजनेत भ्रष्टाचार झाला आहे. योजनेत बोगस कागदपत्रे देऊन आर्थिक घोटाळा करण्यात आला आहे. माजी खासदार इम्तियाज जलील यांनी देखील हा विषय मांडला होता. या योजनेत भाजपच्या नगरसेविकेचा मुलगा लाभार्थी आहे. तर नगरसेविकेच्या पतीची वेगवेगळ्या बँकेत ३३ खाती असून यात करोडो रुपये असल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि आमदार अंबादास दानवे यांनी केला आहे.

दरम्यान, घरकुल योजनेचा त्यांनी लाभ घेतला आहे ज्या एजएनसीला काम देण्यात आलंय. एका शैक्षणिक संस्थेला काम दिल आहे. यांनी हाताने लिहून योजनेत नावे घुसवली आहेत. देवगिरी पतसंस्था आणि एक फायनान्स संस्था आहे तिच्या नावावर यांनी बिले काढली आहेत. सोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावे टॅक्स पावती आणि रेशनिंग कार्ड देखील आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस यांचा पत्ता असल्याचा गंभीर आरोप देखील आमदार अंबादास दानवे यांनी केला आहे.

संभाजीनगर मधील १९८५ रुपये टैक्स थकबाकी आहे. एकनाथ शिंदे यांच्या नावाने देखील रेशनिंग कार्ड आहे. यावर एकनाथ शिंदे त्यांची पत्नी, मुलगा श्रीकांत शिंदे आणि त्यांची पत्नी आणि मुलगा यांचं देखील नाव आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नावे जातीच प्रमाणपत्र देखील आहे. सोबतच एससी प्रमाणपत्र देखील असल्याची माहिती विधान परिषदेत देत अंबादास दानवे यांनी गंभीर आरोप केले आहे.

# शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२६ मध्ये सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत दि.३१ जुलै, २०२६

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : येत्या खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा याकरिता सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणीपासून ते काढणीपर्यंत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा उत्पादनावर विपरीत परिणाम करणाऱ्या बाबीमुळे पिकांच्या उत्पादकतेमध्ये आलेली घट गृहीत धरून विमा संरक्षण लाभणार आहे. खरीप हंगाम २०२६ करिता सहभागाची अंतिम मुदत दि.३१ जुलै, २०२६ अशी आहे.

योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी शेतकरी आेळखपत्र क्रमांक (ऋीशी खऊ) असणे अनिवार्य आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करून शेतकरी ओळखपत्र क्रमांक मिळवणे गरजेचे आहे. पिक विमा नुकसान भरपाईसाठी डिजिटल पीक सर्वेक्षण (ऊड) अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे. कोकण विभागाकरीता शेतकरी सहभागासाठी किमान क्षेत्र १० गुंठे (०.१० हे.) असणे आवश्यक आहे.

कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाकडून नियुक्त इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी, पुणे मार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. कोकण विभागातल्या भात, नाचणी व उडिद पिकांकरीता विमा संरक्षित रक्कम व विमा हप्ता दर खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग, पीक - भात, विमा संरक्षित रक्क (रु. /हेक्टर) - ६५,०००/-, शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता (रु. /हेक्टर) - ६५०/-.

जिल्हा - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग, पीक - नाचणी, विमा संरक्षित रक्क (रु. /हेक्टर) -४०,०००/-, शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता (रु. / हेक्टर) - ४००/-. जिल्हा - पालघर, पीक - उडीद, विमा संरक्षित रक्क (रु. /हेक्टर) -२७,०००/-, शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता (रु. / हेक्टर) - ५४०/-. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. खातेदारांचे व्यतिरिक्त कुळाने व भाडेपट्टीने सुध्दा या योजनेत सहभागी होऊ शकतात. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याचे घोषणापत्र हंगामाच्या आधी किंवा योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी बँकेत सादर करावे. बँका, पतसंस्था, आपले सरकार सेवा केंद्र तसेच अधिकृत विमा प्रतिनिधी यांच्यामार्फत शेतकरी योजनेत भाग घेऊ शकतात. तसेच शासनाच्या पीक विमा संकेतस्थळावरून, क्रॉप इन्शुरन्स ॲप व खऊए ॲप वापरून वैयक्तिकरित्याही योजनेत सहभागी होऊ शकतात. पीक विम्यासाठी अर्ज सादर करताना बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ७/१२ उतारा, आधार कार्ड, पेरणी घोषणापत्र, बँकखात्याचे तपशील, भाडेपट्टी करार असलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत नोंदणीकृत करारनामा, सामाईक खातेदारांच्या बाबतीत संमतीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

योजनेचा दि.०३ जुलै २०२६ रोजीचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या र्हीींिः//ुुु.ारहरीरीहींीर.सेीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी पीक विमा संरक्षणाचा लाभ मिळण्याकरीता योजनेत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे. पीक विमा अर्ज भरताना कुठलीही अडचण उद्भवल्यास किंवा योजनेबाबत अधिक माहितीकरीता जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन कोकण विभाग, ठाणे विभागीय कृषि सहसंचालक शिवाजी आमले यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना आधुनिक बाजारपेठ, प्रक्रिया सुविधा आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध करून देणार : पणन मंत्री जयकुमार रावल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : शेतकऱ्यांना आधुनिक बाजारपेठ, प्रक्रिया सुविधा आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतील असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पाचा आढावा पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. तेव्हा ते बोलत होते.सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत प्रकल्पाची सद्यस्थिती, आतापर्यतची प्रगती तसेच प्रस्तावित मॅग्नेट २.० प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस आशियाई विकास बँकेचे संचालक ताकेशी उएडा, वरिष्ठ जलसंपदा तज्ज्ञ अलेक्सिया मिशेल्स, कृषी व नैसर्गिक संसाधन विशेषज्ञ क्रिशन सिंग रौतेला, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी मूल्यसाखळी आणि काढणीनंतरच्या पायाभूत सुविधांना अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने कामाला गती देण्यात यावी. राज्यातील कृषी उत्पादनांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा वेळेत उभारण्यात याव्यात, असे त्यांनी सांगितले.

राज्यातील कृषी पणन व्यवस्थेला आधुनिक स्वरूप देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, डिजिटल प्रणालींचा वापर, हब-अँड-स्पोक लॉजिस्टिक मॉडेलची उभारणी आणि जेएनपीटी, वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग यांसारख्या प्रमुख पायाभूत सुविधांशी कृषी मूल्यसाखळी जोडण्याचे नियोजन प्रभावीपणे राबविण्याचेनिर्देश तसेच, प्रकल्पाची प्रशासकीय व वित्तीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करून आशियाई विकास बँकेकडील पुढील मंजुरीसाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करावी, असे निर्देशही पणन मंत्री रावल यांनी दिले.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत आतापर्यत ३३ हजारांहून अधिक फलोत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून ६६ काढणी पश्चात पायाभूत सुविधा उपप्रकल्पांना वित्तसहाय्य करण्यात आले आहे. १५० शेतकरी उत्पादक कंपन्या व मूल्यसाखळीतील गुंतवणूकदार यांना सवलतीच्या व्याजदराने आर्थिक सहाय्य, ७३ शेतकरी उत्पादक कंपन्यांना नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब, तसेच २१ कृषी पणन मंडळांच्या सुविधांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. प्रकल्पामुळे सुमारे २.३२ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ झाला असून, ४८ टक्के महिलांचा सहभाग असलेल्या सुमारे ४,३०० रोजगारांची निर्मिती तसेच २७१ कोटी रुपयांची खाजगी गुंतवणूक झाली असल्याचीमाहिती यावेळी देण्यात आली.

या प्रकल्पाअंतर्गत २३ कृषी मूल्यसाखळ्यांचा विकास, एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे क्षमता विकास प्रशिक्षण, ग्रीनफिल्ड कृषी पायाभूत सुविधा, शेतकरी उत्पादक कंपन्यांना अधिक आर्थिक सहाय्य, कृषी प्रक्रिया, साठवणूक, निर्यात आणि बाजार व्यवस्थेचे सक्षमीकरण यावर विशेष भर देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# मुंबई विमानतळावर १०.६५ कोटी रुपये किमतीचे कोकेन जप्त; एका परदेशी व्यक्तीला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अंमली पदार्थाच्या तस्करीविरुद्ध केलेल्या एका मोठ्या कारवाईत, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (ींि) मुंबई विभागीय पथकाने, फ्रीटाउनहून नैरोबीमार्गे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (णएश्‍धअ) आलेल्या एका महिला प्रवाशाकडून २.१२८ किलोग्राम कोकेन जप्त केले. या अंमली पदार्थाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत अंदाजे १०.६५ कोटी रुपये इतकी आहे.

प्राप्त झालेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे, अधिकाऱ्यांनी रविवारी (५ जुलै, २०२६) एका महिला प्रवाशाला हटकले. या प्रवाशाच्या सामानाची एक्स-रे मशीनद्वारे तपासणी केली असता, तिच्या ट्रॉली बॅग्सच्या धातूच्या हँडल्समध्ये काहीतरी लपवल्याचे आढळून आले. त्यानंतर, त्या बॅग्समधील धातूचे हँडल्स काढून तपासले असता, त्यातून दंडगोलाकार आकाराची १७ पाकिटे सापडली. या पाकिटांमध्ये पांढऱ्या रंगाच्या पावडरसारखा पदार्थ आढळून आला; चाचणी उपकरणाद्वारे केलेल्या परीक्षणात तो पदार्थ 'कोकेन' असल्याचे निष्पन्न झाले. आंतरराष्ट्रीय बाजारात १०.६५ कोटी रुपये मूल्य असलेले एकूण २१२८ ग्रॅम (निव्वळ वजन) कोकेन यावेळी जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेला हा प्रतिबंधित माल अंमलीपदार्थ आणि मनोव्यापारिक औषधे (ऱ्झ्प्) कायदा, १९८५ च्या तरतुदींनुसार जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थाच्या तस्करीमागील व्यापक जाळे शोधून काढण्याच्या उद्देशाने पुढील तपास सुरू आहे.'नशा मुक्त भारत' घडवण्याच्या आपल्या संकल्पावर ठाम राहत अंमली पदार्थ जप्त करणे, आंतरराष्ट्रीय तस्करी टोळ्यांचा बिमोड करणे आणि देशाचे आरोग्य, कल्याण आणि सुरक्षा यांचे संरक्षण करणे यांसाठी महसूल गुप्तचर संचालनालय अविरत प्रयत्न करीत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर शहर पोलिसांची मोठी कारवाई; नऊ लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, चोरीचे घरफोडीचे एकूण तीन गुन्हे उघडकीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपुर शहर पोलीस ठाणे गु. र.नं.३११/२०२६ भारतीय न्याय संहिता-२०२३ चे क. ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी नामे: शोभा आबासाहेब निलंगे, रा. शिक्षक कॉलनी, माळशिरस जिल्हा सोलापूर. हे दिनांक रोजी १७/०४/२०२६ रोजी दुपारी ०२/३० वा चे सुमारास माळशिरस ते पंढरपूर बसने प्रवास करत असताना २८ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र किंमत ३,४५०००/- तीन लाख पंचेचाळीस हजार रुपये किमतीचे चालू भावाप्रमाणे पंढरपूर बस स्थानक येथून अज्ञात चोरट्याने चोरी केलेले होते.




त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास चालू असता सदर गुन्हयाचे तपासकामी पथके तयार करून पंढरपूर शहरातील ३६ ते ४० सी.सी. टी.व्ही फुटेज चेक करून व मोबाईल टॉवरचे तांत्रिक विश्लेषण करून सदर गुन्हयात दोन आरोपी नामे:- १) प्रिया रवींद्र काळे वय ३० वर्ष, रा राजापूर ता. मंगळवेढा जिल्हा सोलापूर,

२) संदीप युवराज मोरे वय २६ वर्ष, रा. अंबाबाई मंदिर गरिबी हटाव झोपडपट्टी नंबर दोन, विजापूर रोड सोलापूर यांचेकडून सदर गुन्ह्यात चोरी केलेला १००% मुद्देमान हस्तगत करण्यात आलेला आहे.

गु.र. क्र २८४/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), प्रमाणे दाखल गुन्ह्यातील फिर्यादी नामे मुकुंद संजय चव्हाण रा सुस्ते ता.पंढरपूर जिल्हा सोलापूर यांचे दिनांक ०३/०५/२०२६ रोजी १२/३० वा वाजताचे सुमारास त्यांचा मावस भाऊ वैभव जाधव यांचे श्रीराम मंगल कार्यालय इसबावी पंढरपूर येथे लग्न समारंभात गर्दीचा फायदा घेऊन नवरी मुलीचे फिर्यादीचे आईकडे ठेवलेले बॅग मधील २०.७८९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ५.९२० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण, ९.८०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे चोकर्स असे एकूण ३६.४९९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत ५,४०,०००/- रुपये चालू भावाप्रमाणे अज्ञात चोरट्याने चोरी केले होते.

सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान पंढरपूर शहर व इतर गाव व शहरातील जवळपास ६५ ते ७० सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी करून तसेच सी डी आर एस डी आर व मोबाईल टॉवर चे तांत्रिक विश्लेषण करून सदर गुन्ह्यात आरोपी नामे - संदीप युवराज मोरे वय २६ वर्ष, रा अंबाबाई मंदिर गरीबी हटाव झोपडपट्टी नंबर दोन विजापूर रोड सोलापूर यांच्याकडून सदर गुन्ह्यात चोरी केलेला १००% सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत.

गु.र. क्र ४३२/२०२६ भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्ह्यातील फिर्यादी नामे स्वाती भारत डुकरे रा, आंबी ता. राहुरी जिल्हा अहिल्यानगर यांचे दिनांक २७/०६/२०२६ रोजी १०/३० वा चे सुमारास पंढरपूर बस स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक चार येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ०३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र किंमत ४५०००/- रुपये चोरी केले होते,

सदर तपासादरम्यान २४ तासाच्या आत पंढरपूर शहरातील ४० ते ४५ सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी करून आरोपी नामे चांदणी हिरु भोसले वय २० वर्ष, रा माळवाडी, वडगाव गुप्ता, ता जिल्हा अहिल्यानगर हीच्याकडून १००% मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

असे एकूण ६७.४९९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत, ९,३०,०००/- रुपये किमतीचे, १००% मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री. प्रशांत डगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे श्री. टी वाय मुजावर उ्ह पथक पोलीस उपनिरीक्षक श्री. नितीन जगताप, श्रेपोसइ राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, पोह ३९८ सिरमा गोडसे, पो,ह ३५३/उबाळे, पोह १७८९ सचिन हेंबाडे, पोह १३०७ पाटील, पोना/५६३/साहिल तांबोळी, पोना/५४६ कृष्णा पकाले, पोशि १२१६ शहाजी मंडले, पोशि १३०४ नवले, पोकॉ १५१३ बजरंग बिचुकले, पोकॉ १२४०, हर्षद ठाकर, पो ३३५/लक्ष्मण वाघमोडे तसेच सायबर शाखा सोलापुर ग्रामीण चे पोशि ११८२ रतन जाधव, १४९६/प्रकाश वाघमारे यांनी केली आहे.

## आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही वाहनमालक महाराष्ट्रात वास्तव्यास असून राज्यातील बँकांकडून कर्ज घेत असतानाही वाहनांची नोंदणी मात्र दादरा-नगर हवेली, दमण-दीव, पुदुच्चेरी आदी ठिकाणी केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. अशा प्रकारांवर आरटीओकडून कारवाई सुरू आहे. भविष्यात कर चुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी पडताळणी तसेच कर्ज व रहिवासाशी संबंधित कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येईल.

आरटीओ विभागासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी, ध्वनिचित्रफिती आणि अन्य आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकारी प्रियंका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. या त्रिसदस्यीय समितीत अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड आणि दक्षता अधिकारी मंदार जावळे यांचा समावेश आहे. या समितीला एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## निफाड नगरपंचायत अध्यक्षपदी अरुंधती पवार यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा कांताबाई अशोक कर्डिले यांनी दिनांक ११ जून २०२६ रोजी आपल्या पदाचा स्वेच्छेने राजीनामा मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केल्यामुळे रिक्त झालेल्या नगराध्यक्ष पदासाठी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ तसेच प्रचलित नियमांनुसार निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.



त्याअनुषंगाने निफाड नगरपंचायत अध्यक्ष पदाच्या निवडीसाठी निफाड नगरपंचायत सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर विशेष सभेस एकूण १० नगरसेवक/नगरसेविका तसेच १ स्वीकृत नगरसेवक उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेचे कामकाज पिठासीन अधिकारी तथा तहसीलदार, निफाड विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

सभेच्या प्रारंभी निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी सभेच्या कामकाजाचे स्वरूप व निवडणूक प्रक्रियेची माहिती सभेस दिली.

नगराध्यक्ष पदासाठी अरुंधती विजय पवार यांचा एकमेव नामनिर्देशन अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाला. सदर अर्जाची छाननी व अन्य आवश्यक कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अन्य कोणताही वैध उमेदवारी अर्ज प्राप्त न झाल्याने, पिठासीन अधिकारी विशाल नाईकवाडे यांनी . अरुंधती विजय पवार यांची निफाड नगरपंचायत अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर केले.

याप्रसंगी उपस्थित नगरसेवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवनिर्वाचित अध्यक्षा अरुंधती विजय पवार यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## निफाड ते पंढरपूर सायकलिस्ट करणार सायकल वारी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड सायकलिस्ट वतीने दरवर्षी वारकरी परंपरा, पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जिवन शैली आणि सायकलिंग संस्कृतीचा संदेश देणारी निफाड ते पंढरपुर सायकल वारी आयोजित करण्यात आली असून . या वर्षी सुमारे ४० सदस्य नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन सोबत या सायकल वारीत सहभागी होणार असून शुक्रवार दि १० रोजी पहाटे ५.०० वाजता श्री विठ्ठल मंदिर, निफाड येथून प्रस्थान करणार आहेत. पहिला मुक्काम अहिल्यानगर येथे होणार असून शनिवार दि ११रोजी पंढरपुर येथे पोहोचणार आहेत. रविवार दिनांक १२ रोजी राज्यातील हजारो सायकलिस्ट एकत्र येऊन सायकल रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. निफाड सायकलिस्ट सदस्य यांनी प्रॅक्टिस म्हणून भद्रा मारुती, चांदवड-वडबारे, पाटणा देवी, सापुतारा अशा अनेक ठिकाणी दर रविवारी सायकलिंग केले आहे. धार्मिक परंपरेसोबत पर्यावरणपूरक वाहतुक, आरोग्याविषयी जनजागृती, सायबर सुरक्षा, सायकलिंग क्षेत्राला चालना देणारा ह्या उपक्रमाचे परिसरातून कौतुक करण्यात येत असून सायकल वारी यशस्वी करणेसाठी अध्यक्ष पांडुरंग कडवे, उपाध्यक्ष संदीप गवळी, सचिव दिपक बोरसे, संचालक दिपक घंगाळे, राजू गवळे, शेखर बागडे, पुजा मगर, मनिषा वाघ, आरती मेगल आणि सर्व सायकलिक्ट सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

## प्रवीण बागडे यांच्या कवितेला प्रथम क्रमांकाचा मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : सामाजिक भान जपणारे लेखक, कवी व विचारवंत प्रवीण बागडे यांच्या कवितेला विठुमाऊली बहुउद्देशीय संस्था, कनारखेड (जि. बुलढाणा) व काव्यसागर साहित्य मंच, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांना संस्थेतर्फे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेत राज्यभरातील अनेक कवींचा सहभाग असताना प्रवीण बागडे यांच्या आशयघन, सामाजिक जाणीव जागृत करणाऱ्या आणि विचारप्रवर्तक कवितेची परीक्षकांनी प्रथम क्रमांकासाठी निवड केली. हा सन्मान त्यांच्या सातत्यपूर्ण साहित्यसाधनेची आणि दर्जेदार लेखनाची पावती मानला जात आहे.



प्रवीण बागडे हे सामाजिक, राजकीय व समकालीन विषयांवर परखड लेखन करणारे लेखक म्हणून परिचित असून, त्यांच्या कविता व लेख विविध वृत्तपत्रे आणि नियतकालिकांत सातत्याने प्रकाशित होत असतात. या यशाबद्दल साहित्य, सामाजिक, पत्रकारिता व विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. हा सन्मान आगामी साहित्यनिर्मितीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**विठुमाऊली बहुउद्देशीय संस्था, कनारखेड व काव्यसागर साहित्य मंच, शेगाव आयोजित राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत उल्लेखनीय यश**

## इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेची विद्यार्थिनींसाठी विशेष फेरी-२ जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत विद्यार्थिनींसाठी विशेष फेरी-२ चे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून या फेरीची प्रक्रिया १० जुलैपासून सुरू होणार आहे. विद्यार्थिनींना प्रवेशाची अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही विशेष फेरी राबविण्यात येत असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिली आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील ९ हजार ६८८ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विशेष फेरी-२ अंतर्गत १० ते ११ जुलैदरम्यान नवीन विद्यार्थिनींची नोंदणी, अर्जातील दुरुस्ती तसेच पसंतीक्रम भरण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. विद्यार्थिनींना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविता येणार आहेत. या फेरीतील प्रवेश वाटप प्रक्रिया १२ जुलै रोजी राबविण्यात येईल. त्यानंतर १३ जुलै रोजी प्रवेश वाटप यादी प्रसिद्ध केली जाणार असून विद्यार्थिनींना त्यांच्या लॉगिनद्वारे वाटप झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती उपलब्ध होईल. प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थिनींना १३ ते १४ जुलैदरम्यान संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करता येणार आहे. विशेष फेरी-२ नंतरच्या प्रवेश प्रक्रियेचे पुढील वेळापत्रक १४ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये १५ जुलै २०२६ पासून नियमितपणे सुरू होणार आहेत. विद्यार्थिनी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांनी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार सर्व कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.

**पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त लोकशिक्षणपर अभिनव उपक्रमांचे उद्‌घाटन**

## मनाची शांती हाच सर्वात मोठा दागिना : ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगांवकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जगात अनादिकालापासून अज्ञान अस्तित्वात आहे आणि ते दूर करण्याचे कार्य वेद, शास्त्रे, ग्रंथ आणि संतांनी केले आहे. मात्र आज स्वार्थ, द्वेष आणि अज्ञानामुळे माणसातील सात्त्विकता कमी होत चालली आहे. अशा काळात मनाची शांती हाच जीवनातील सर्वात मोठा दागिना आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगांवकर यांनी केले. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे आणि श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र आळंदी येथील माईर्स एमआयटी अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग (जए) मध्ये पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने युनेस्को अध्यासन अंतर्गत लोकशाही, मानवाधिकार, शांती व सहिष्णुतेसाठीच्या लोकशिक्षणपर होणाऱ्या विविध अभिनव उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. हा सोहळा विश्वशांती केंद्र (आळंदी) आणि



माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शुभआशीर्वादाने संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वशांती दिंडी (आळंदी ते श्री-क्षेत्र पंढरपूर)च्या संस्थापक अध्यक्षा ह.भ.प. उषा विश्वनाथ कराड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगांवकर आणि माजी उपअधीक्षक पोलिस (डीवायएसपी) ज्ञानेश्वर मुंडे उपस्थित होते. यावेळी श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या समन्वयक तसेच माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे, एमआयटी अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगचे संचालक डॉ. महेश डी. गौडर, एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे संचालक डॉ. बाळासाहेब वाफारे व एमआयटी संत ज्ञानेश्वर बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. समाधान निकुंभ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कलशपूजन आणि संत ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी डॉ. बाळासाहेब वाफारे म्हणाले, गेल्या चार दशकांपासून माईर्स एमआयटी संस्था विश्वशांती, मानवकल्याण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी विश्वशांतीसाठी उभे केलेले कार्य आजच्या पिढीसह भावी पिढ्यांनाही प्रेरणादायी ठरणारे आहे.

माजी डीवायएसपी ज्ञानेश्वर मुंडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले, आध्यात्मिक शांती प्राप्त करणे हे फार थोड्या व्यक्तींना साध्य होते आणि ते प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. सरस्वती नदीचा उगम असलेल्या माना गावातील श्री सरस्वती मंदिराच्या उभारणीचे पुण्यकार्य त्यांच्या हस्ते संतकृपेने साकार झाले आहे.

प्रा. स्वाती कराड-चाटे यांनी सांगितले, प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी विश्वशांती केंद्राच्या माध्यमातून वारकरी संप्रदाय, संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रसार करण्याचे भव्य कार्य उभे केले आहे. विश्वरूप दर्शन मंचाच्या माध्यमातून ही ज्ञान, अध्यात्म आणि विश्वबंधुत्वाची परंपरा अखंडपणे पुढे नेणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगांवकर यांनी केले. सूत्रसंचालन ह.भ.प. शालिकराम खंदारे यांनी केले, तर प्राचार्य डॉ. समाधान निकुंभ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पंढरपूर प्रतिनिधी
जनसंपर्क विभाग
माईर्स एमआयटी, पुणे.

